**ये दिल मांगे मौत (कोक-पेप्सी भारत छोडो)**

**प्रथम आवृती** : नोव्हेंबर २००५
**द्वितीय आवृत्ती**: नोव्हेंबर २०१४

**प्रकाशक व मुद्रक**:
अलका जोशी, c/o लोकायत, 129 बी/2, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, एरंडवणे, पुणे – 4

**मुद्रणस्थळ**:
आर. एस. प्रिंटर्स, 455, शनिवार पेठ, पुणे – 30

**कॉपीराईट नाही.**

**प्रस्तावित सहयोग मूल्य**: रु. 5/-

# आमची निवडक प्रकाशने

| | |
|---|---|
| देवळांचा धर्म आणि धर्माची देवळे | रु. ५/- |
| सार्वजनिक विमा क्षेत्र लिलावात | रु. ५/- |
| तरुणांनो, विचार कराल तर ... | रु. ५/- |
| मी नास्तिक का आहे: शहीद भगतसिंग | रु. ५/- |
| कोळी आणि माशी | रु. ५/- |
| लढा वॉलमार्टशी | रु. १०/- |
| तुम्ही बेकार का ? | रु. १०/- |
| शहीद भगतसिंगाचे तरुणांना आवाहन | रु. १५/- |
| शिक्षणाची राखरांगोळी | रु. १५/- |
| इरादे कर बुलंद | रु. १५/- |
| भारत पुन्हा गुलामीकडे | रु. २०/- |
| आण्विक वेडेपणा | रु. २०/- |
| उठ माणसा: गाणी संघर्षाची | रु. ३०/- |
| जागतिकीकरण की नवी गुलामगिरी? | रु.१५०/- |
| वॉलमार्ट भगाओ, खुदरा क्षेत्र बचाओ | रु. १०/- |
| वैश्वीकरण या पुन:औपनिवेशीकरण? | रु.१५०/- |
| Unite to Reclaim the Judiciary | Rs. 5/- |
| Public Sector Insurance on Sale | Rs. 5/- |
| Resist the Silent Emergency | Rs. 10/- |
| Fight FDI in Retail | Rs. 10/- |
| Palestine, Israel and the Arab-Israeli Conflict | Rs. 10/- |
| The Crisis of Global Warming | Rs. 15/- |
| Yeh Dil Mange Maut (Coke Pepsi Quit India) | Rs. 15/- |
| India Becoming a Colony Again | Rs. 20/- |
| Unite to Fight Nuclear Madness! | Rs. 20/- |
| Is the Government Really Poor? | Rs. 20/- |
| Globalisation or Recolonisation? | Rs. 150/- |
| Nuclear Energy: Technology From Hell | Rs. 295/- |

# प्रस्तावना

भारतात आता मोठ्या प्रमाणात बहुराष्ट्रीय कंपन्या येऊ लागल्या आहेत. १९९१ पासून भारतीय अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले. त्यानंतर आलेल्या सर्व शासकांनी गालिचे अंथरून आणि हारतुरे घालून बहुराष्ट्रीय कंपन्यांचे स्वागत केले. एवढेच नाही तर त्यांचा जास्तीत जास्त फायदा व्हावा यासाठी आपल्या देशातील कायदे बदलले, निर्बंध शिथिल केले, नियमांमध्ये बदल केले.

बहुराष्ट्रीय कंपन्या अवाढव्य आहेत. इतक्या की कित्येक देशांवर त्या नियंत्रण ठेवू शकतात. 'वॉलमार्ट' किरकोळ विक्री करणारी बलाढ्य कंपनी (२०११ चा महसूल ४४७ अब्ज डॉलर्स) १७४ देशांपेक्षा मोठी आहे. पाकिस्तान आणि बांगलादेश एकत्र केले तरीही 'शेल' त्यापेक्षा मोठी आहे. 'फोर्ड' न्यूझिलंड पेक्षा मोठी आहे. २००९ मध्ये जगातील सर्वात मोठ्या १०० अर्थव्यवस्थांपैकी ४४ कॉरपोरेशन्स होत्या. त्यांचा एकत्रित महसूल – ६४०० अब्ज डॉलर्स – १५५ देशांच्या एकूण अर्थव्यवस्थांपेक्षा जास्त होता.

बहुराष्ट्रीय कंपन्या एका अर्थाने हुकूमशहा आहेत. त्यांच्या कामात पारदर्शकता नसते. अधिकाधिक नफा कमावणे हाच त्यांचा एकमेव उद्देश. १९८० पासून अधिकांश देशांनी जागतिकीकरण स्वीकारले, आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना आपल्या देशात प्रवेश देऊन आपल्या अर्थव्यवस्था त्यांच्या हाती सोपवल्या. परिणामी त्यांनी जगभर त्यांचे वर्चस्व स्थापन केले आहे. कुठलाही आर्थिक उपक्रम मग तो औषधांचे उत्पादन असो किंवा स्कूटर/कार उत्पादन असो, दळणवळण किंवा आय.टी. असो, कीटकनाशकांचे उत्पादन किंवा गहू/तांदूळाचे उत्पादन असो किंवा अगदी बँकिंग आणि फायनान्स असो, जागतिक पातळीवर मूठभर बलाढ्य कॉरपोरेशन्सचा त्यावर ताबा आहे. उदाहरणार्थ, आज कार उद्योगामध्ये जगभरातील ५०% उत्पादन फक्त ५ बहुराष्ट्रीय कंपन्या करतात; जगातील ध्वनीमुद्रित संगीताचा पुरवठा प्रामुख्याने फक्त ४ कंपन्या करतात; जगभरातील औषध उद्योगावर १० कंपन्यांचं नियंत्रण आहे; कीटकनाशकांच्या जागतिक बाजारपेठेपैकी ८४% बाजारपेठेवर १० कीटकनाशक कंपन्यांचं वर्चस्व आहे; इ.

ह्या महाकाय बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जागतिक अर्थव्यवस्थेचा ताबा घेतल्यामुळे सामान्य माणसांवर त्याचा विघातक परिणाम झाला आहे. एका बाजूला मूठभर लोकांचा ढीगभर संपत्तीवर ताबा आहे. जगातल्या ११२६ अब्जाधीशांकडे ४६०० अब्ज डॉलर्स एवढी एकूण संपत्ती आहे (२०१२ मध्ये). जगभरातील २.४५ कोटी कोट्यधीशांचा (जागतिक प्रौढ लोकसंख्येच्या फक्त ०.५५%) जागतिक संपत्तीच्या



३५.६% वर ताबा आहे (२०१० मध्ये) आणि जगातील सर्वात श्रीमंत १०% लोक जगातल्या ८३% संपत्तीचे मालक आहेत. दुसऱ्या बाजूला जगातील एकूण लोकसंख्येपैकी निम्म्या लोकांची कमाई दिवसाला अवघ्या २ डॉलर्स (शंभर रुपये) पेक्षाही कमी आहे. यातील बहुतेकजण कुपोषित आहेत किंवा सतत आपल्याला पुढचं जेवण कसं मिळणार ह्या चिंतेत असतात. १०० कोटीहून जास्त लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नाही; १५० कोटी लोकांना वीज नाही; २५० कोटी लोकांना स्वच्छतागृहे नाहीत.

आता तर बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या अधिकाधिक नफ्याच्या प्रचंड लालसेने जगासमोर एक अभूतपूर्व संकट निर्माण केलं आहे. जास्त नफ्यासाठी जास्त उत्पादन म्हणजे पर्यावरणाचा ऱ्हास. ह्यामुळे पृथ्वीच्या तापमान वाढत आहे आणि आता त्याने धोक्याची पातळी ओलांडली आहे. समुद्राची पातळी वाढणं, विक्रमी तापमान, वेळीअवेळी कोसळणारा मुसळधार पाऊस व पूर, आणि भयानक वादळं येऊ लागली आहेत. शास्त्रज्ञांनाही भीती वाटू लागली आहे की लवकरच अशी वेळ येईल की हे संकट थांबवणे शक्य होणार नाही. परिणामी, पृथ्वीवरील प्राणिमात्रच नाही तर मानवी अस्तित्वही धोक्यात येणार आहे. पण पर्यावरणीय ऱ्हास नियंत्रित करण्याच्या कुठल्याही करारावर अमेरिका आणि इतर विकसित देश सह्या करायला तयार नाहीत. कारण बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या नफ्यावर त्याचा परिणाम होईल ना!

भारतात मुक्तपणे प्रवेशलेल्या अक्राळविक्राळ कंपन्यांचं हेच रूप आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्राचा – शेतीपासून औद्योगिक क्षेत्रापर्यंत आणि वित्तीय क्षेत्रापासून सेवा क्षेत्रापर्यंत आणि आता तर संरक्षण खात्याचाही त्या झपाट्याने ताबा घेत आहेत. त्यांच्या भारतीय भागीदारांच्या – भारतातील बलाढ्य उद्योगघराणी – मदतीने आता त्या देशातल्या नैसर्गिक साधन संपत्तीवर – जंगले, नद्या, समुद्र, खनिज संपत्ती – ताबा घेत आहेत. संपूर्ण अर्थव्यवस्था मोडून-तोडून अशा प्रकारे बनवली जात आहे की त्यातून जास्तीत जास्त नफा पिळून काढला जाऊ शकतो. आरोग्य, शिक्षण, दळणवळण, वीज अशा सर्व अत्यावश्यक सेवाही नग्न नफेखोरीसाठी खाजगी कंपन्यांच्या ताब्यात दिल्या जात आहेत. भारतीय राज्यकर्त्यांची दृष्टी नफ्याच्या हावेपोटी एवढी संकुचित झाली आहे की जगण्यासाठी आवश्यक असलेला भूगर्भातील पाण्याचा साठाही त्यांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांना त्यांच्या फायद्यासाठी वापरायला दिला आहे.

कोक आणि पेप्सी ह्या भारतात आलेल्या महाबलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील दोन कुविख्यात कंपन्या. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भारतातील प्रवेशाचा आपल्या जीवनावर काय परिणाम होत आहे ते विषद करण्यासाठी कोक आणि पेप्सीच्या कार्याचा आढावा ह्या पुस्तिकेमध्ये घेतला आहे.

# कोक-पेप्सी भारत छोडो!

*ठंडा मतलब कोकाकोला ... ओये बबली .. ये प्यास है बडी* .... अशा जाहिरातींमधून प्रसिद्ध चित्रपट तारे-तारका किंवा क्रिकेट खेळाडूंनी आजच्या तरुणाईला इतकं वेडं केलं आहे की आपल्याही हातात कोक-पेप्सीची बाटली कधी येते ते समजत नाही. आणि ती येतच राहते. का पितो आपण कोक-पेप्सी? तहान भागते म्हणून? मित्रमैत्रिणींबरोबर कॉलेजमध्ये टाईमपास म्हणून? की फॅशन म्हणून? असे कितीही प्रश्न स्वत:ला विचारले तरी त्यांची उत्तरे कदाचित सापडणार नाहीत. पण तरीही तहान म्हणजे कोक-पेप्सी हे समीकरण आपल्या डोक्यात बसलेलं आहे. कालपरवापर्यंत कोकम सरबत किंवा लिंबू सरबत पिणारे आपण एवढे कोक-पेप्सी कडे कसे काय वळलो? फक्त दोन दशकांपूर्वी आपला व्यवसाय भारतात चालू केलेल्या ह्या कंपन्यांनी आज भारतातील शीतपेयांचा ९५ टक्के बाजार काबीज केला आहे.

घामाघूम झाल्यावर जरा तरतरी येण्यासाठी आपण कोक-पेप्सी सारख्या शीतपेयांकडे वळतो. एकदा नाही तर परत परत प्यावंसं वाटावं असं काय आहे या शीतपेयांमध्ये? ह्यामध्ये असं काय आहे की ज्यामुळे आपल्याला तरतरी येते?

## ह्या बाटलीमध्ये दडलंय काय?

**आम्ल पदार्थ**

सर्वच शीतपेयांमध्ये अनेक प्रकारची आम्ल असतात. 'किक' येण्यासाठी ती घातली जातात. या शीतपेयांमध्ये ॲसिटिक, फ्यूमेरिक, ग्लुकॉनिक आणि फॉस्फरिक ॲसिड असतात. त्यांची एकत्रित ताकद एवढी असते की मोरी तुंबली तर ती साफ करण्यासाठी किंवा मोटारच्या बॅटरीवर गंज चढला तर तो काढण्यासाठी या शीतपेयांचा 'चांगला' उपयोग होतो. कल्पना करा की आपल्या शरीराला किती अपाय होत असेल? आपल्या शरीरात आम्ल आणि अल्क ह्यांचा नाजूक समतोल राखलेला असतो. शीतपेयांच्या अतिसेवनाने तो बिघडतो. पोटात आग होते, आतड्यांना सूज येते, तर पचनावर विपरीत परिणाम होऊ शकतो.




**कॅफिन**

यात असतं कॅफिन. झिंग आणणारं. कृत्रिमरित्या उत्तेजित करणारं. एका ३०० मिलीग्राम बाटलीमध्ये ३० ते ४० मिलीग्राम कॅफिन असतं. जवळजवळ सर्वच शीतपेयांमध्ये हेतुपूर्वक कॅफिन घातलं जातं. हे नशा आणणारं व सवय लावणारं आहे. थंड करून प्यायल्यामुळे तर त्याची ताकद अधिकच वाढते. यामुळे ताजेतवानं वाटतं खरं, पण या कॅफिनमुळे कोक-पेप्सीच्या व्यसनात आपण नकळत ओढले जातो. यामुळे निद्रानाश, भीती, चिंता, चिडचिड, उच्चरक्तदाब इत्यादी आजार होण्याची शक्यता वाढते. कॅफिनमुळे शरीरातील कॅल्शियम लघवीवाटे बाहेर फेकले जाते. याशिवाय स्त्रियांच्या जनन क्षमतेवरही परिणाम होतो.

**जास्त साखर**

शीतपेयांच्या प्रत्येक बाटलीत ८ ते ९ चमचे साखर असते – इतर घटक पदार्थांची कडवट चव घालवण्यासाठी. ती ही अतिशय घातक प्रकारची – हाय फ्रुक्टोज कॉर्न सिरप. शीतपेयांमधील साखरही नशायुक्त कार्य करते. शीतपेयाची एक बाटली प्यायल्यावर तहान शमल्यासारखी वाटते खरे; पण लगेचच दुसरी बाटली पिण्याची इच्छा होते. कारण त्यातल्या अति जास्त साखरेमुळे पुन्हा तहान वाढते. अशा बाटल्यांवर बाटल्या रिचवल्या की लठ्ठपणाला निमंत्रण ठरलेलंच. मग त्याच्या अनुषंगाने येणारा हृदयविकार आणि मधुमेहाचा धोका आलाच. सांधेदुखी सारखे आजारही बळावतात. शीतपेये टिकवून ठेवण्यासाठी यात सोडियम बेन्झोएट हा पदार्थ घातला जातो, ज्यामुळे कर्करोगाचा धोका वाढतो. अमेरिकेतल्या संशोधनातून कोक-पेप्सीचे हे सर्व दुष्परिणाम दिसून आले आहेत. याशिवाय शीतपेयांमधील आम्ल आणि साखरेच्या जास्त प्रमाणामुळे दात खराब होतात आणि ठिसूळही होतात. हवं तर पडलेला दात कोकच्या बाटलीत टाकून पहा.

**आणि भारतात कीटकनाशकेही**

शीतपेये 'सुरक्षित' म्हणूनही आपण पितो. पण भारतात विकल्या जाणाऱ्या कोक-पेप्सीमध्ये तर कीटकनाशकेही सापडली आहेत. दिल्लीतील सेंटर फॉर सायन्स ॲन्ड एन्व्हायर्नमेंट या संस्थेने कोकाकोला आणि पेप्सीको ह्या कंपन्या तयार करत असलेल्या आणि विकत असलेल्या बारा शीतपेयांचा अलीकडेच तपास केला. सर्व नमुन्यांमध्ये अनेक प्रकारची कीटकनाशके सापडली. याचं प्रमाण एवढं प्रचंड होतं की त्यामुळे कर्करोग होऊ शकतो, मज्जापेशींवर व पुनरुत्पादन क्षमतेवरही दुष्परिणाम होऊ शकतो, जन्मत: व्यंग होऊ शकतं आणि प्रतिकारशक्तीलाही अडथळा येऊ शकतो.



***डाएट सोडा***

कोक आणि पेप्सी या कंपन्या डाएट सोड्याची आरोग्यदायी शीतपेय म्हणून जाहिरात करतात. ह्यामुळे वजन वाढत नाही व तत्संबंधी होणारे आजारही होत नाहीत असा दावा करतात. ते खोटं बोलतात! प्रत्यक्षात डाएट सोड्यामुळेही वजन वाढतं, त्यामुळे हृदयविकार आणि त्याबरोबर येणाऱ्या आजारांचा धोकाही वाढतो. वर नमूद केलेले सर्व घटक पदार्थ तर यात असतातच त्याशिवाय घातक साखरेऐवजी त्यात कृत्रिमरित्या गोडपणा आणण्यासाठी अस्पारटेम नावाचं रसायन घातलं जात (जे शुगर फ्री मध्येही असतं), ज्याचे भयंकर दुष्परिणाम होतात. ह्याचा मज्जातंतूंवर विपरीत परिणाम होतो, यकृत खराब होतं, हृदयविकार बळावतात. आता तर हे ही सिद्ध झालं आहे की यामुळे पार्किनसन्स, अल्झायमर आणि ब्रेन ट्यूमर सारखे आजार होण्याचा धोकाही उद्भवतो.

***लहान मुलांवरील परिणाम***

शीतपेयं कंपन्या आपल्या जाहिरातींमध्ये आणि मार्केटींग करताना लहान मुलांना खास लक्ष्य बनवतात. शीतपेयांमधील सर्व घटक पदार्थांचे लहान मुलांवर गंभीर परिणाम होतात. कोक-पेप्सी मधील कॅफिन आणि फॉस्फरिक ॲसिडमुळे कॅलशियम हाडांमधून खेचले जाऊन लघवीवाटे शरीराबाहेर फेकले जाते. कॅलशियमची कमतरता विशेषत: मुलांच्या वाढत्या वयामध्ये घातक परिणाम करते. अभ्यास असं दर्शवतात की शीतपेयं पिणाऱ्या मुलांमध्ये हाडं मोडण्याच्या धोक्याचं प्रमाण ३-५ पटींनी जास्त आहे.




शीतपेयांमधील अतिजादा साखरेमुळे लहान मुले लठ्ठपणा-मधुमेह ह्या रोगांचे लक्षणीय बळी होत आहेत. प्रौढांना होणारा मधुमेह आता मुलांनाही मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. हीच मुलं जेव्हा मोठी होतात तेव्हा त्यांच्यामध्ये अवयवछेदन, आंधळेपणा, हृदयविकार आणि किडनी निकामी होणे यासारख्या समस्या वाढू लागतात.

***पण...***

जगभरातले कोट्यवधी लोक वर्षानुवर्षे ही शीतपेये पितात. जर ही खरोखरच इतकी हानिकारक आहेत तर इतके लोक ती कशी पितील, असा प्रश्न पडणे



स्वाभाविक आहे. पण त्याचे उत्तरही तितकेच स्वाभाविक आहे. विडी, सिगरेट किंवा तंबाखूचे उदाहरण घ्या. तंबाखू आरोग्याला अपायकारक आहे हे तंबाखूचे सेवन करणाऱ्या बहुतेकांना माहित असते. पण तरीही त्याचे व्यसन जडते आणि मग तंबाखू चांगला नाही हे कळूनही तो पिच्छा सोडत नाही. कोक-पेप्सीचंही तसंच आहे.

## आरोग्याचे मित्र देशी पेयं

कोक आणि पेप्सी ह्या दोन्ही कंपन्या एकमेकांच्या स्पर्धक तर आहेतच पण एकत्रितपणे त्या भारतातील स्थानिक पेयांच्या विरोधक आहेत. प्रसिद्धीची सर्व माध्यमे वापरून, कोट्यवधी रुपये उधळून शीतपेयं कंपन्या आपल्या पौष्टिक पेयांच्या बदल्यात विषारी पाणी आपल्याला प्यायला लावतात. खरंतर आपल्या देशात अनेक चविष्ट आणि परंपरागत पेये उपलब्ध आहेत. कोकम सरबत, लिंबूपाणी, शहाळं, उसाचा रस, पन्हं, लस्सी, ताक, फळांचे रस या सर्वांमध्ये जीवनसत्वे व खनिजे भरपूर असतात. ही पेये घरी बनवता येतात किंवा कॅन्टीन, हॉटेल, गाड्यांवरही स्वस्तात मिळतात. असे असूनही हे महागडं रंगीत विषारी पाणी आपण पितो.

# कहाणी कोक–पेप्सीची

अवघ्या शंभर वर्षात ह्या शीतपेयांनी जगावर ताबा मिळवला आहे. त्यांच्या यशाचा त्यांच्या उत्पादनाच्या गुणवत्तेशी काडीचाही संबंध नाही. ह्या कंपन्या इतक्या प्रचंड मोठ्या आहेत की त्यांच्याशी कुणीही स्पर्धा करूच शकत नाही. जगातील शीतपेयांची ७० टक्के बाजारपेठ कोक-पेप्सीने काबीज केली आहे. याशिवाय शीतपेयांची लोकांना सवय लावण्यात या कंपन्या इतक्या यशस्वी झाल्या आहेत की त्यांची बाजारपेठ दरवर्षी पाच टक्क्यांनी वाढते आहे. तहान आणि भूक ह्या माणसाच्या नैसर्गिक गरजांचे भांडवल करून त्यावर करोडो रुपये कमावणाऱ्या या दोन्ही कंपन्यांचा इतिहास समजून घेतल्याशिवाय त्यांच्या आजच्या कारवायांचा नीट उलगडा होणार नाही.

कोक-पेप्सीचा जन्म अमेरिकेत झाला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात पाणी आणि कार्बन-डाय-ऑक्साईडचे मिश्रण म्हणजेच सोडा अमेरिकेत प्रचंड लोकप्रिय होता. व्यापारी ह्यामध्ये विविध रंग आणि स्वादांचे मिश्रण करून लेमोनेड, जिंजर, रासबेरी अशी पेयं बनवत. १८८६ मध्ये जॉन पेंबरटन ह्या औषधव्यापाऱ्याने कोकच्या पानाचा उत्तेजक रस आणि कोलाच्या बियांचा उत्तेजक अर्क यांचे

सोड्याबरोबर मिश्रण करून एक आकर्षक शीतपेयं तयार केलं. हे दोन्ही उत्तेजक अर्क आणि कार्बन-डाय-ऑक्साईडची झिंग यांच्या संयोगाने बनवलेलं हे 'उत्साहवर्धक' रासायनिक पेयं लवकरच मोठं लोकप्रिय झालं. हाच कोकाकोला. कोकाकोलाने आक्रमक जाहिरातींमधून विक्री वाढवून प्रचंड नफा कमावला, आणि १९२९ पर्यंत अमेरिकेतील शीतपेयांच्या बाजारपेठेत वर्चस्व प्रस्थापित केलं. याचवेळी कोकने अमेरिकेच्या बाहेरही हातपाय पसरायला सुरुवात केली. विशेषत: युरोपमध्ये.

पेप्सीकोलाचा इतिहासही फार वेगळा नाही. पेप्सीचा जनक कॅलेब ब्रॅडहॅम हाही औषधव्यापारीच होता. शिवाय सोडा फाऊंटनचा मालक. १८९० च्या सुमारास त्यानेही एक मिश्रण बाजारात आणलं. त्याला वाटलं की ह्यामुळे पेप्टीक अल्सरच्या वेदना थांबतील, म्हणूनच पेप्सीकोला हे नाव. पण हे फारसे लोकप्रिय झालं नाही आणि १९३१ मध्ये या कंपनीचं दिवाळं निघालं. चार्लस गुथने पेप्सी कंपनी विकत घेऊन मूळ रसायनात बदल केला. त्याने कोकाकोलाची नक्कल करून त्याच चवीचं पेयं बाजारात आणलं. ते लोकप्रिय करण्यासाठी कोकच्या निम्म्या किंमतीत ते विकायला सुरुवात केली. तो १९३० चा महामंदीचा काळ होता. कोक आपल्या मक्तेदारीमुळे किंमत कमी करायला तयार नव्हते. त्यामुळे पेप्सीची बाजारपेठ वेगाने वाढली. परिणामी, १९४५ च्या सुमारास पेप्सीची विक्री कोकच्या विक्रीच्या सुमारे २५ टक्क्यांपर्यंत जाऊन पोचली होती. पेप्सीची बाजारपेठेतील ताकद वाढली तशी त्यांनी किंमतही वाढवली. त्यानंतर कोक-पेप्सी मधील किंमतयुद्ध संपले. आता दोघं फक्त जाहिरात युद्ध करतात.

## *दोन्ही हातात लाडू*

कोकने १९२९ मध्ये जर्मनीत प्रवेश केला. लवकरच जर्मनी ही कोकची दुसऱ्या क्रमांकाची बाजारपेठ झाली. जर्मन ब्रॅंड म्हणून स्वत:चे स्थान निर्माण करण्याचे कर्तृत्व हे कोकच्या जर्मनीतील यशाचे रहस्य होते. कोकने १९३६ च्या बर्लिन ऑलिंपिक स्पर्धा पुरस्कृत केल्या. नाझी नेत्यांबरोबर जवळीक दाखवण्याचे सर्व प्रयत्न केले. त्यांच्या बरोबरच्या मैत्रीमुळे कोक जर्मनीच्या पाठीशी उभी आहे असा संदेश जनमानसात ठसला. या लोकप्रियतेच्या जोरावर कंपनीने खोऱ्याने नफा ओढला. १९२९ मध्ये जर्मनीमध्ये शून्यातून सुरू झालेल्या कोकची १९३९ मध्ये ४० लाख क्रेट इतकी प्रचंड विक्री झाली. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा विध्वंस झाल्यावरही १९४४ मध्ये कोकने २० लाख क्रेट विक्री केली!

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात एका बाजूला जर्मन नाझींच्या बरोबर खांद्याला



खांदा लावून उभे राहातानाच कोकने जाहिरातींच्या माध्यमातून अमेरिकन सैनिकांमध्येही देशभक्तीच्या नावाने आपली प्रतिमा ठसवायला सुरुवात केली. युद्धाच्या काळात सैनिकांचे मनोबल वाढण्यासाठी कोकची किती आवश्यकता आहे, हे 'खास' वजन टाकून सैन्याधिकाऱ्यांना पटवून दिले. अमेरिकी लष्करी खात्याकडूनच पैसे घेऊन जिथे जिथे सैनिक जातील तिथे तिथे कोकने कारखाने उभे केले. आपल्या जाहिरातींमधून ह्याचा भरपूर वापर करून मायभूमीतील खप वाढवला. युद्ध संपल्यानंतर अमेरिकेचे लाखो सैनिक मायभूमीत परतले ते कोकचे फॅन होऊनच. कोकलाही मोठी बाजारपेठ मिळाली. आणि आता कोक अमेरिकेची राष्ट्रीय प्रतिमा बनले.




अमेरिकन जनतेला आणि सैनिकांना हे माहीत नव्हतं की त्यांचे शत्रूही जर्मनीमध्ये कोकचाच आस्वाद घेत, त्याच देशभक्तीच्या रसात रंगून गेले होते. कोकने आपले पाय दोन्हीकडे रोवले होते. **युद्ध कोणीही हरले तरी कोक मात्र जिंकणारच होते.**


दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका नामक साम्राज्याचा उदय झाला आणि अमेरिकेच्या वर्चस्वाबरोबरच कोक-पेप्सीचे साम्राज्यही जगभर पसरू लागले. पराभूत जपान व जर्मनीवरचा कब्जा, जगभरचे लष्करी तळ, कोरियातील युद्ध, विएतनामवरील आक्रमण यामुळे अमेरिकी सैन्य आणि त्याबरोबर कोकाकोला आणि पेप्सीकोलाही देशोदेशी पसरले. १९७० च्या दशकात तिसऱ्या जगातील देशांची स्वायत्त भांडवली विकासाची मॉडेल्स संकटात सापडली. त्यांनी विदेशी कर्ज घ्यायला सुरुवात केली. लवकरच हे देश पाश्चिमात्य सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात पूर्णपणे अडकले. आता अमेरिकेला या देशांचा हात पिरगळणे सोपे होते. या देशांना त्यांच्या अर्थव्यवस्था विदेशी भांडवलासाठी खुल्या करणे भाग पाडले गेले. जागतिक अर्थव्यवस्थेच्या जागतिकीकरणाला सुरुवात झाली. विकसित देशांच्या बलाढ्य कंपन्या जगातल्या कानाकोपऱ्यात पसरल्या. कोक-पेप्सीचं जाळंही विस्तारलं.

आज जगातल्या दोनशे देशांमध्ये कोक-पेप्सीचा अंमल आहे. शीतपेयांबरोबरच फळांचे रस, एनर्जी पेयं, चहा, कॉफी, दूध आधारित पेयं वगैरे मिळून कोकाकोलाची ३५०० पेक्षा जास्त पेयं आहेत. पेप्सीकोचीही शेकडो प्रकारची पेयं आहेत; त्याशिवाय पौष्टिक पदार्थ, अल्पोपहार यातही त्यांनी आपला धंदा वाढवला आहे.

उत्पादनांमध्ये ही विविधता आणूनसुद्धा जगभरातल्या शीतपेयांपैकी ४०% एवढा मोठा वाटा सोडायुक्त पेयांचा आहे. प्रचंड आर्थिक ताकदीच्या जोरावर देशोदेशीच्या राज्यकर्त्यांना मिंधे बनवून, फसव्या जाहिरातबाजीतून लोकांना या शीतपेयांकडे आकर्षित करून त्याद्वारे प्रचंड नफा कमावत ह्या कंपन्या घोडदौड करत आहेत.

## फाजील चंगळवाद

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या ताकदीची आपल्याला जाणीव नाही. त्यांनी दूरदर्शन, वर्तमानपत्रे, संगीत, चित्रपट अशा सर्व मनोरंजन, प्रचार आणि शिक्षणाच्या माध्यमांना ताब्यात घेतलं आहे. आणि त्यांचा वापर आपल्या उत्पादनाच्या जाहिरातींसाठी करत आहेत. त्याद्वारे लोकांना प्रभावित करून त्यांनी काय वाचायचं, काय स्वप्नं पाहायची, काय विचार करायचा, काय पाहायचं, अगदी काय खायचं आणि प्यायचं हे सुद्धा ठरवायची जणू मक्तेदारीच घेतली आहे. ह्याचा चलाखीने वापर करून त्यांनी आपल्याला उपभोग करा, आणखी उपभोग करा ह्यासाठी प्रवृत्त केले आहे.आजच्या मक्तेदारी भांडवलशाहीमध्ये ह्याने एक नवीन रूप घेतलं आहे. ते म्हणजे प्रचंड चंगळवाद – खरेदी करा, साठा करा, वापरा आणि आणखीन वापरा. माणसांच्या मूलभूत गरजांशी, आनंदाशी त्याचा काहीही संबंध नसला तरी. आपल्या मूलभूत गरजांशी काडीचाही संबंध नसलेल्या गोष्टींची खरेदी करावी यासाठी गरजांचा आभास निर्माण केला जातो. जाहिराती आणि मार्केटिंग तंत्र, हे असा आभास निर्माण करण्याचं प्रमुख माध्यम. या तंत्राच्या जोरावर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी जगभरच्या सर्वसामान्य लोकांना केवळ ग्राहक बनवून जखडून ठेवले आहे. मानसिक गुलाम बनवले आहे. आपण आपली स्वत:ची ओळख, अस्मिता, संस्कृती, जीवनपद्धती सारंच विसरत चाललो आहोत.



**खरेतर वस्तूंचा हव्यास हा काही माणसाचा स्थायीभाव नाही.** मानववंशशास्त्रज्ञांचा अभ्यास असं सांगतो की आदिकालातील माणसांची आपापसातील नाती आणि स्वभाव आजच्या प्रगत आणि भांडवली काळात लक्षणीय असलेल्या अत्यंत स्वार्थी, स्पर्धात्मक वैशिष्ट्यांपेक्षा खूपच वेगळा होता. समानतेचा पुरस्कार करणाऱ्या त्या आदिम समाजात माणूस सहकार्याने राहत होता. खाजगी



मालमत्तेचा हव्यास नव्हता, कोणी राज्यकर्ते नव्हते. स्वार्थापेक्षा औदार्य हा गुणविशेष होता. ह्यात बदल झाला तो ५०० वर्षांपूर्वी उदयाला आलेल्या भांडवलशाही व्यवस्थेमुळे. भांडवलशाहीमध्ये मानवी गरजा भागवणे हे उद्दिष्ट नसून नफा आणि फक्त नफा हे एकच उद्दिष्ट ठेवून उत्पादन केलं जातं. अर्थातच जास्तीत जास्त नफा कमावण्यासाठी भांडवलदारांना आपापसांत स्पर्धा करावी लागते. परिणामी माणसामाणसातील सहकार्याच्याऐवजी आक्रमक आणि तीव्र स्पर्धा, व्यक्तिवाद आणि लालसा हीच मूल्यं बनून ती संबंध समाजात पसरू लागली.

## कोकाकोला–पेप्सीचे जाहिरात तंत्र

कोक आणि पेप्सी ह्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनीही जाहिरातबाजीचं तंत्र अत्यंत पद्धतशीरपणे राबवून आपल्या खाण्यापिण्यावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ह्या दोन्ही कंपन्या मिळून जगभरात जाहिरातींवर वर्षाला ३० हजार कोटी रुपये खर्च करतात.

मीडियामधील जाहिरातींव्यतिरिक्त शीतपेयं कंपन्या आपलं उत्पादन विकण्यासाठी निरनिराळ्या मार्केटिंग तंत्रांवर अब्जावधी डॉलर्स खर्च करतात – कॉरपोरेट सामाजिक जबाबदाऱ्यांच्या अभियानापासून ते क्रीडास्पर्धा, मनोरंजन आणि संगीताचे कार्यक्रम पुरस्कृत करण्यापर्यंत.

ह्या शीतपेयांच्या प्रचाराचं एक मुख्य लक्ष्य म्हणजे तरुण मुले-मुली. तरुण मुलांना आकर्षित करण्यासाठी ह्या दोन्ही कंपन्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धांचे आयोजन-प्रायोजन, फिल्मी सितारे व खेळाडू यांना घेऊन जाहिराती, नाच-गाणी, तरुणांसाठी खास संगीत कार्यक्रम इत्यादी मार्गांचा पुरेपूर वापर करत आहेत. तरुण मुलांना आवडणारे सचिन-सौरव सारखे खेळाडू, शाहरूख-आमीर सारखे अभिनेते, पॉप स्टार्स हे कोक-पेप्सीच्या जाहिरातींमध्ये आढळतात. एका मिनिटाच्या एकेका जाहिरातीसाठी करोडो रुपये हे खेळाडू, अभिनेते घेतात आणि या कंपन्या कोणतीही खळखळ न करता ते देतात. यामुळे आपला खप प्रचंड वाढणार आहे याची कोक-पेप्सीला कल्पना आहे. आता तर या कंपन्या खास लहान मुलांच्या मालिका-चित्रपटांमधील लोकप्रिय पात्रांचाही जाहिरातींसाठी वापर करत



आहेत. कोकने *हॅरी पॉटर,* तर पेप्सीने डिस्नेच्या *मॉन्स्टर्स* ह्या चित्रपटांचे प्रसिद्धीचे अधिकार घेतले आहेत. याशिवाय लहान मुलांची खेळणी आणि पुस्तके बाजारात आणून, इंटरनेटवरील खेळांद्वारेही शीतपेयांच्या जाहिराती या कंपन्या करत आहेत. कोकने चार वर्षाच्या मुलांसाठी बाजारात खेळणी आणली आहेत.

या कंपन्या शाळांमधेही घुसल्या आहेत. कोक-पेप्सीने अमेरिकेत शाळांच्या भिंती, कॅन्टीन, बस ह्यावरही जाहिरात करण्यासाठी सर्व शाळांना कोट्यवधी रुपये दिले. याशिवाय चॅनल १ हा एक खास टी.व्ही. कार्यक्रमही सुरू झाला आहे. अमेरिकेत हा कार्यक्रम १२००० शाळांमधून दाखवण्यासाठी करार झाला आहे. ह्या कार्यक्रमात मुलांनी रोज १० मिनिटे बातम्या आणि २ मिनिटे जाहिराती पहाणं अपेक्षित आहे. बहुतेक जाहिराती शीतपेयं किंवा फास्ट फूडच्या असतात. त्यासाठी ह्या चॅनेल १ च्या कंपनीने शाळांच्या प्रत्येक वर्गासाठी एक टी.व्ही. संच बक्षीस दिला आहे. अशा प्रकारे कोक-पेप्सीसारख्या कंपन्या मुलांवर जाहिरातींचा भडीमार करत आहेत.

## सरकार चूप का?




या कंपन्यांची ताकद एवढी आहे की त्या सरकारी संस्थांनाही आपल्या कह्यात करून घेण्यात निष्णात आहेत. शीतपेयांचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कमी करून दाखवण्यासाठी त्या वैज्ञानिकांना विकत घेतात इतकंच नाही तर त्यांनी बनावट संशोधनसंस्थाही उभारल्या आहेत. अनेक सामाजिक संस्था-संघटनांनाही वश करून घेण्याचा प्रयत्न या कंपन्या सतत करत असतात. कोकाकोला अमेरिकेतील एका पालक-शिक्षक संघटनेची पुरस्कर्ती आहे. कोकाकोलाचे व्हाईस प्रेसिडेंट आता या संस्थेच्या अधिकारपदावरही आहेत. अमेरिकेतील अनेक विद्यापीठांच्या अधिकारमंडळांवरही कोकाकोला आणि पेप्सीको या कंपन्यांचे अधिकारी आहेत. या कंपन्या आपल्या टीकाकारांची तोंडे बंद करण्यासाठी खुलेआम पैशाच्या थैल्या वाटतात. अमेरिकेतील बालदंतचिकित्सा अकादमीने शीतपेये आणि दातांमध्ये येणारा ठिसूळपणा यांचा थेट संबंध सप्रमाण दाखवला होता. कोकाकोलाने या अकादमीला १० लाख डॉलर्सची देणगी दिली; ही देणगी मिळाल्यानंतर अकादमीच्या अध्यक्षांनी भाषा बदलली. कोकाकोलाने जागतिक आरोग्य संघटनेलाही (WHO) देणगी दिली आहे; ती आता WHO च्या लठ्ठपणावर लढण्यासाठीच्या सल्लागार मंडळावर



आहे. याशिवाय कोकाकोला आणि पेप्सिको अमेरिकेतील दोन्ही डेमोक्रट्स आणि रिपब्लिकन या दोन्ही प्रमुख पक्षांना निवडणूकांमध्ये लाखो डॉलर्स देणग्या देतात.

अशा परिस्थितीत लोकांच्या आरोग्यासाठी सरकार ह्या कॉरपोरेशन्सवर कारवाई करेल अशी अपेक्षा करणं म्हणजे चोराला शेत राखायला ठेवण्यासारखं आहे.

# भारतामध्ये कोक-पेप्सी

### *कुणी निंदा कुणी वंदा – आमचा फसवणुकीचा धंदा*

कोकाकोला आणि पेप्सी या कंपन्यांनी भारतातही फसवणुकीचा धंदा करूनच आपली पाळेमुळे रुजवली आहेत. १९६० च्या दशकात भारतात पाय रोवलेल्या कोकाकोला कंपनीला १९७७ मध्ये आपल्या देशातून हाकलण्यात आले होते. याचे कारण कोकाकोला कंपनीची मग्रुरी. तेव्हाच्या कायद्याप्रमाणे भारतात येणाऱ्या कोणत्याही परदेशी कंपनीने आपल्या सहयोगी भारतीय कंपनीला ६० टक्के मालकी हक्क देणे बंधनकारक होते. हे बंधन पाळण्यास कोकाकोला कंपनीने नकार दिला. कारण त्यांना त्यांच्या गडगंज नफ्यातील ६० टक्के नफा गमवावा लागला असता. अट मोडल्यामुळे भारत सरकारने त्यांची हकालपट्टी केली.




१९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात, भारतात जागतिकीकरणाचे वारे वाहायला सुरुवात झाली होती. भारत सरकारने पाश्चात्य बहुराष्ट्रीय कंपन्यांचं भारतात स्वागत करायला सुरुवात केली होती. १९९१ च्या परकीय चलनाच्या संकटानंतर भारत सरकारने जागतिक बॅंकेचा आर्थिक सुधारणा कार्यक्रम लागू करायला सुरुवात केली. त्यानंतर मोठ्या प्रमाणात भारतात विदेशी कंपन्या यायला लागल्या.

पेप्सीने १९८८ साली भारतात प्रवेश केला तर कोकाकोलाने १९९३ मध्ये.

पेप्सिकोने भारतात येताना सुरुवातीला ५०,००० लोकांना रोजगार देण्याचे आश्वासन दिले होते. खाद्य प्रक्रियेसाठी ७४ टक्के तर शीतपेयांसाठी फक्त २६ टक्के गुंतवणूक करण्याचे जाहीर केलं होतं. एकूण उत्पादनापैकी ५० टक्के निर्यात करणे, परकीय चलन देशाबाहेर न पाठवणे, निर्यात व आयात यांचे प्रमाणे ५ : १ ठेवणे, उत्कृष्ट तंत्रज्ञान पुरवणे अशा अटी सुरुवातीला मान्य केल्या होत्या. पण हे सर्व वायदे विसरून सरकारच्या बोटचेप्या धोरणाचा फायदा घेतला.

कोकाकोलाने जेव्हा भारतात पुनर्प्रवेश केला तेव्हा भाग भांडवलातील ४९ टक्के वाटा त्यांनी भारतीयांना देणे बंधनकारक होते. पण खोट्या सबबी पुढे करत कोकाकोलाने वारंवार टाळाटाळ केली. २००२ मध्ये तर सरकारने ही अटच शिथिल केली आणि कोकाकोलाचे चांगलेच फावले.

देशाचे कायदे आणि सरकारच्या अटी न पाळणाऱ्या या कंपन्यांनी या देशातल्या न्यायालयांचे आदेशही पायदळी तुडवले आहेत. कोणत्याही खाद्यपदार्थांच्या वेष्टनावर घटक पदार्थांची नावे व प्रमाण देणे बंधनकारक आहे. ह्याच कायद्याअंतर्गत राजस्थान उच्च न्यायालयाने कोकाकोला व पेप्सीको कंपन्यांना त्यांच्या उत्पादनांवर फक्त घटक पदार्थच नाहीत तर कीटकनाशके व रसायने ह्यांचाही उल्लेख करावा असा आदेश दिला होता. न्यायालयाचा हा निर्णय या कंपन्यांनी आजपर्यंत पाळलेला नाही. भारतातील मुर्दाड नोकरशाहीने आणि बड्या कंपन्यांचे भाट बनलेल्या सरकारनेही या नियमांची अंमलबजावणी करण्याचे टाळले आहे.

सर्वच बहुराष्ट्रीय कंपन्या असाच व्यवहार करतात. त्यांनी आपल्या 'नफ्यासाठी' आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिकेतील अनेक देशांचे सार्वभौमत्व झिडकारले आहे.

### *नैसर्गिक साधन संपत्तीचा नाश*


कोकाकोला आणि पेप्सीने भारतात विविध ठिकाणी बाटल्या भरण्याचे ९० कारखाने सुरू केले आहेत. ह्या महाबलाढ्य कंपन्या, त्यांच्या विषारी उत्पादनासाठी प्रचंड प्रमाणात भूगर्भातील पाणी उपसत असल्यामुळे, जमिनीखालील पाण्याचा साठा कमी होत आहे. प्रत्येक कारखान्यात भूगर्भातून सरासरी ५ ते १५ लाख लिटर पाणी रोज उपसलं जातं. ज्या भागात हे कारखाने आहेत तेथील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे. याशिवाय त्यांचं विषारी पाणी कारखान्याबाहेर फेकलं जातं. हे पाणी पिण्यायोग्य तर नाहीच, पण आंघोळीसाठी वा कपडे धुण्यासाठीही त्याचा वापर करता येत नाही. शिवाय प्रदूषणामुळे शेतजमिनीही खराब होऊ लागल्या आहेत. परिणामी जिथे जिथे बॉटलींग कारखाने आहेत त्या परिसरात राहणाऱ्या लोकांना पाण्याचा तुटवडा निर्माण झाला आहे. फक्त शेतीसाठीच पाण्याची कमतरता भासते आहे असे नाही तर पिण्याच्या पाण्याचीही कमतरता निर्माण झाली आहे. विहिरी ओस पडू लागल्या आहेत, हातपंपांना पाणी येत नाही, महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी कित्येक किलोमीटर चालत जाऊन पाणी आणावं लागतं.

एका बाजूला श्रीमंतांचे चोचले पुरवणारी पेये तयार करायची, ती



विकण्यासाठी नवनव्या क्लुप्त्या योजायच्या आणि दुसरीकडे ती शीतपेयं जे विकत घेऊ शकणार नाहीत, अशा गरीब कष्टकऱ्यांच्या जगण्याचा आधार नाहीसा करायचा असा धुमाकूळ ह्या कंपन्या घालत आहेत.

### *लढा इथे संपला नाही*



या लुटारू कंपन्यांच्या कारवाया फक्त एवढ्याच नाहीत. धनिकांच्या आरोग्याची काळजी वाहणारे बाटलीबंद पाणी विकण्यासाठीही या कंपन्या भूगर्भातील लाखो लिटर पाणी उपसतात. ते ही अगदी फुकट! अत्यंत प्रगत तंत्रज्ञान वापरले तरीही पाणी शुद्धीकरणाचा खर्च फक्त २५ पैसे प्रती लिटर आहे. हेच पाणी बाटलीबंद करून आपल्याला १५-२० रुपयांना विकलं जातं. पाणी विकण्याचा हा धंदा १६०० कोटी रुपयांचा झाला आहे आणि दरवर्षाला ४०% एवढ्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे. देशात विकल्या जाणाऱ्या बाटलीबंद पाण्यापैकी कोकाकोलाच्या 'किनले' आणि पेप्सिकोच्या 'ऍक्वाफिना' या ब्रॅन्डसचा वाटा ५०% आहे.

श्रीमंतांची तहान भागवण्यासाठी गरिबांच्या तोंडचे पाणी अक्षरश: पळवले जात आहे. खरे तर ही पाण्याच्या खाजगीकरणाच्या दिशेने होत असलेली वाटचाल आहे हे लक्षात घ्यायला हवे. जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या पुढाकाराने केलेल्या अभ्यासानुसार नजीकच्या भविष्यात हा मोठा किफायतशीर धंदा होणार आहे. बाटलीबंद पाणी ही त्याची सुरुवात आहे. केरळ, मध्यप्रदेश आदि राज्यांमधून ग्रामीण जनतेचा पाण्यावरचा हक्क हिरावून नदीच्या काही विभागांवर खाजगी कंपन्यांना मक्तेदारी हक्क बहाल करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. छत्तीसगढ मध्ये तर एक नदीच खाजगी कंपनीच्या मालकीची आहे. दिल्लीसारख्या शहरातुनही पिण्याच्या पाण्याच्या खाजगीकरणाची सुरुवात झाली आहे. भारतीय जनतेला पाण्यापासून वंचित करून पाण्याचे खाजगीकरण करून देशी-विदेशी मोठमोठ्या कंपन्यांचे खिसे भरण्याचा हा डाव उधळलाच पाहिजे.

## प्लाचीमाडा आणि इतर लोकलढे

पाण्यासारखी जीवनावश्यक गोष्ट न मिळाल्यामुळे तसेच जीवनसाधनेच नष्ट होत चालल्यामुळे कोक-पेप्सीच्या कारखान्याच्या आसपासच्या गावकऱ्यांनी

संघर्षाला सुरुवात केली आहे.




केरळच्या पालघाट जिल्ह्यातील प्लाचीमाडा गावात कोकाकोलाचा मोठा प्रकल्प होता. २००० साली बाटल्या भरण्याचा हा कारखाना सुरू करताना कंपनीने रोज १५ लाख लिटर पाणी उपसणाऱ्या ६५ विहिरी प्लाचीमाडाच्या परिसरात खणल्या. कारखाना सुरू झाल्यापासून एका वर्षातच गावातल्या इतर विहिरी कोरड्या पडू लागल्या. भातशेतीसाठी प्रसिद्ध असलेल्या प्लाचीमाडातील शेते पाण्याअभावी सुकू लागली. पिण्याच्या पाण्यासाठीही ४-५ किलोमीटर पायपीट करण्याची वेळ आली. पाण्याच्या या टंचाईबरोबरच कारखान्यात वापरून दूषित झालेले पाणी परिसरात सोडले जाऊ लागले. एवढंच नाही तर सुरुवातीला या कंपन्यांनी कारखान्यात निर्माण होणारा प्रदूषित कचरा शेतकऱ्यांना खते म्हणून फुकट वाटला. पुरेशी माहिती नसलेल्या भोळ्या भाबड्या शेतकऱ्यांनी खत म्हणून हे विषारी पदार्थ वापरायला सुरुवात केली. त्यामुळे पिकांचे नुकसान तर झालेच पण गावकऱ्यांच्या अंगावर पुरळही उठू लागल्याचे लक्षात आले. केरळमधील प्रदूषण नियंत्रण मंडळाने आणि इंग्लंडमधील एक्स्टर विद्यापीठातील संशोधनात या खतांमध्ये शिसे व कॅडमियम हे विषारी धातू असल्याचे दिसून आले.

या सर्व त्रासामुळे गावकरी एकत्र आले. २००२ सालापासूनच कोकच्या कारखान्याविरोधात संघर्ष सुरू केला. निदर्शने, मोर्चे आणि कारखान्याबाहेर २४ तास धरणे. सुरुवातीला डाव्या पक्षांपासून उजव्या पक्षांपर्यंत सर्वांनी कोकाकोला कंपनीला पाठिंबा दिला. पण लोकांनी आपला लढा सुरूच ठेवला. हळूहळू तो संपूर्ण राज्यात पसरला. निदर्शने आणि धरण्यांमध्ये गावकरीच नाही तर शाळेतील मुलांचा सहभागही वाढला. मग राजकीय पक्षांनाही आपला दृष्टिकोन बदलावा लागला. आणि शेवटी २ वर्षांच्या संघर्षाचा परिणाम म्हणजे कोकाकोलाचा कारखाना २००४ साली बंद झाला.

पण नुसतं कारखाना बंद करून लोक गप्प बसलेले नाहीत. त्यांचं आरोग्य, पर्यावरण आणि त्यांची जीवनसाधनं ह्यावर झालेल्या परिणामांमुळे ते आता नुकसानभरपाईसाठी लढत आहेत. शेवटी नाईलाजाने सरकारला एक समिती स्थापन करावी लागली. या समितीने २०१० साली आपला अहवाल दिला आहे. त्यात त्यांनी कंपनीने गावकऱ्यांना २१६ कोटी रुपये नुकसानभरपाई द्यावी असं म्हटलं



आहे. केरळ विधानसभेनी २०११ मध्ये यासंबंधी एक विधेयक पारित केलं. तेव्हापासून हे बिल राष्ट्रपतींच्या मंजुरीची वाट पाहत आहे. पण ह्या बहुराष्ट्रीय कंपन्यांची ताकद एवढी आहे की भारत सरकार त्यावर मूग गिळून आहे.

प्लाचीमाडातील गावकऱ्यांप्रमाणेच राजस्थानातील जयपूर जवळील कालाडेरापासून उत्तरप्रदेश मधील मेंहदीगंज, बलिया आणि जौनपूर पासून महाराष्ट्रातल्या ठाणे जिल्ह्यातील कुडुस गावा पर्यंत त्या त्या ठिकाणी राहणाऱ्या हजारो गावकऱ्यांनी संघर्षाला सुरुवात केली आहे. त्या त्या ठिकाणचे कोक-पेप्सीचे कारखाने बंद करण्याची मागणी घेऊन ते लढत आहेत. हे सर्व कळूनही जनतेच्या आरोग्याची पर्वा न करणारे केंद्र सरकार आणि राज्यांमधली सरकारे ह्या बहुराष्ट्रीय कंपन्यांपुढे गुडघे टेकत आहेत.

### ***लढा पसरला देशभर***

कोक-पेप्सीची बेकायदेशीर कृत्ये जसजशी समोर येऊ लागली तसतसे देशभरातील लोक त्याला विरोध करण्यासाठी रस्त्यावर उतरले.'कोक-पेप्सी भारत छोडो' च्या घोषणा करत तसेच सरकारने त्यांचे बॉटलिंग कारखाने बंद करावेत ही मागणी घेऊन लाखोंच्या संख्येने तरुण-तरुणी, सामन्य लोक, शाळकरी मुले-मुली देशभर आंदोलन करू लागले. त्यात प्रा. बनवारीलाल शर्मा यांनी सुरू केलेल्या आझादी बचाओ आंदोलनाने एक मुख्य भूमिका निभावली आहे. त्याची एक झलक:

- १ फेब्रुवारी २००१ ला पाचशे शिक्षणसंस्थांमधील ४ लाख विद्यार्थ्यांनी अलाहाबाद, वाराणसी आणि जौनपूर ह्यांना जोडणारी ३०० किलोमीटर लांबीची मानवी साखळी केली.
- २९ जानेवारी २००३ ला दहा लाख विद्यार्थी आणि गावकऱ्यांनी दिल्लीला घेराव करणारी, राजस्थान, उत्तरप्रदेश, हरियाणा व पंजाबचे २२ जिल्हे आणि चंदीगढच्या केंद्रशासित प्रदेशाला जोडणारी, १२०० किलोमीटर लांबीची मानवी साखळी तयार केली. यामध्ये कडाक्याच्या थंडीतही २००० शाळा-कॉलेजेस सहभागी होते.
- २० जानेवारी २००५ ला १४ राज्यांमधील कोक-पेप्सीच्या ५० कारखान्यांच्या भोवती लोकांनी घेराव केला. कारखान्यांच्या गेटवर लोकांची जीवनसाधने नष्ट करणे आणि पर्यावरणाचा नाश ह्या आरोपांवर लोकन्यायालये भरवली.

*(आपण हे का नाही ऐकलं? कारण, देशातील प्रमुख वर्तमानपत्रांसाठी हे संघर्ष महत्त्वाचे नव्हते!)*

आणखी एक आशादायी गोष्ट घडली ती म्हणजे अनेक कॉलेजातील विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, विद्यापीठांचे कुलगुरू यांनी कोक आणि पेप्सी विरोधात रस्त्यावर उतरून बंड पुकारले आहे. चेन्नईमधील अन्ना विद्यापीठ, कोईम्बतूर येथील महिलांचे अविनाशलिंगम अभिमत विद्यापीठ तसेच अहमदाबाद येथील गुजरात विद्यापीठ आणि वाराणसीतील काशी विद्यापीठातील हजारो विद्यार्थी आणि शेकडो प्राध्यापक सर्वांनी एकत्र येऊन कोक-पेप्सीवर बहिष्कार टाकून आपल्या संस्थांमधून हद्पार केले आहे. अनेक शाळा-कॉलेजेसनी आपल्या संस्था 'कोक-पेप्सी मुक्त आवार' म्हणून घोषित केल्या आहेत.

कोकाकोला कंपनीने प्लाचीमाडा व कोलंबिया येथे मानवी हक्कांची पायमल्ली केली, त्याविरोधातील संघर्ष आता युरोप अमेरिपर्यंत पोचला आहे. प्लाचीमाडा, कोलंबिया व इतर अनेक ठिकाणच्या लोकांच्या कोक-पेप्सी विरोधातील संघर्षाला पाठिंबा म्हणून युरोप, अमेरिका व इतर देशातील विद्यार्थी-कामगारांनी आपापल्या परिसरात कोकाकोलावर बहिष्कार टाकला आहे. तेथील अनेक विद्यापीठांच्या आवारातून कोकला हद्पार केले आहे तर अनेक कामगार संघटनांनी युनियन कॅन्टीन मध्ये कोकवर बहिष्कार घातला आहे.

### *प्लाचीमाडा जाहीरनामा*

जानेवारी २००४ मध्ये, जगभरातून जनआंदोलनातील दोन हजार पेक्षा जास्त प्रतिनिधींनी प्लाचीमाडा येथे भरलेल्या 'जागतिक पाणी परिषदे'त भाग घेतला. तिथे संमत केलेला जाहीरनामा हा बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विरोधातील जागतिक लोकलढ्याचा जाहीरनामा आहे.

- *पाणी जीवन आहे. ती निसर्गाची देणगी आहे.*
- *पाणी ही कुणाची खाजगी मालमत्ता नाही. ते साऱ्यांच्याच मालकीचे आहे.*
- *पाणी हा सर्वांचा मूलभूत अधिकार आहे. तो जपला पाहिजे. पाण्याची टंचाई निर्माण होऊ न देणे, ते पुढील पिढयांसाठी राखून ठेवणे हे आपले मूलभूत कर्तव्य आहे.*
- *पाणी ही विकाऊ वस्तू नाही. पाण्याच्या खाजगीकरणाचे प्रयत्न थोपवलेच पाहिजेत.*
- *पाण्याच्या वापरावर स्थानिक लोकांचा अधिकार असला पाहिजे.*
- *प्लाचीमाडातील लोकांबरोबर एकजुटीने रणांगणात उतरलेले आम्ही सर्वजण जगातील सर्व लोकांना कोकाकोला व पेप्सीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करत आहोत.*



## संघर्षात सामिल व्हा!

मित्रहो, बहुराष्ट्रीय कंपन्या आपण काय खायचं, प्यायचं, वाचायचं, पाहायचं एवढंच नाही तर काय विचार करायचा यावरही ताबा मिळवत आहेत. कोक आणि पेप्सी याच बहुराष्ट्रीय कंपन्यांची प्रतीके आहेत. त्या त्यांच्या उत्पादनांचा मारा आपल्यावर करतात आणि आपण त्याला बळी पडतो. ही मानसिक गुलामगिरी आपल्याला तोडलीच पाहिजे.

या कंपन्यांच्या आर्थिक ताकदीसमोर आपलं कणा नसलेलं सरकार काहीच करू इच्छित नाही. आता आपल्यालाच कृती करावी लागेल. मानसिक गुलामगिरी झटकून टाकून, आपली आयुष्यं उध्वस्त करणाऱ्या 'बहुराष्ट्रीय कंपनी सरकारच्या' विरोधातील कोक-पेप्सी विरुद्धच्या लढ्यात सामील होऊया. त्याचं पहिलं पाऊल म्हणून आपण या शीतपेयांवर बहिष्कार टाकू शकतो.

कोक-पेप्सी फक्त घातक आहेत म्हणून नव्हे; जाहिरातींद्वारे ती आपल्याला विषारी द्रव्य प्यायला लावतात म्हणून नव्हे; त्यांनी प्लाचीमाडा, मेहदीगंज आणि इतर ठिकाणच्या हजारो लोकांची जीवनसाधनं नष्ट केली म्हणून नव्हे; तर आपल्याला या शीतपेयांच्या बहिष्कारामध्ये खालील कारणांसाठीपण सामील झालं पाहिजे:

- या कंपन्या आपल्या देशाचे कायदे जुमानत नाहीत; देशाच्या न्यायसंस्थेने दिलेले निर्णय पाळत नाहीत; आपल्या देशाच्या सरकारबरोबर झालेले करार पाळत नाहीत;
- आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे पाणी हा मूलभूत अधिकार आहे, बहुराष्ट्रीय कंपन्यांना ते लुटण्याची परवानगी देता कामा नये.

**म्हणून या बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतातून हाकलून दिलं पाहिजे. चला तर,**

- ***कोक पेप्सीवर बहिष्कार टाकूया;***
- ***आपल्या शाळा कॉलजच्या कॅन्टिन, कार्यालयांमधून कोक पेप्सीला हद्पार करूया;***
- ***ठिकठिकाणच्या कोक-पेप्सीविरुद्धच्या आंदोलनांना पाठिंबा देऊया;***
- ***शहरामध्ये मानवी साखळी, सायकल फेरी याद्वारे जनजागृती करूया.***



# आमच्याबद्दल: लोकायत

जाहिरातींच्या मायाजालात फसून आज कोट्यवधी लोक कोक-पेप्सी सारखी आरोग्याला आणि पर्यावरणाला हानिकारक पेये पीत आहेत. खरंतर आज अशा बलाढ्य बहुराष्ट्रीय कंपन्या टीव्ही आणि वर्तमानपत्रांच्या माध्यमांमधून लोकांची मानसिकता घडवत आहेत.

आज बहुसंख्य प्रसारमाध्यमांची मुख्य कमाई जाहिरातींमधून येते, आणि या जाहिरातींच्या पैशाच्या जोरावर बहुराष्ट्रीय कंपन्या मीडियालाही नियंत्रित करतात. आमच्या वस्तू विकत घ्या, खुश व्हा, आणि समाजाला विसरुन जा हाच भडीमार सतत आपल्यावर होत असतो. मूठभर कंपन्यांच्या हितासाठी होणाऱ्या या भडीमारामुळेच आजची चंगळवादी, भोगवादी, स्वार्थी जीवनशैली वाढत आहे.

आज याच सडलेल्या संस्कृतीविरुद्ध लढण्याची आणि पर्यायी लोकाभिमुख संस्कृती तयार करण्याची गरज आहे. ही संस्कृती तयार करण्याचाच एक प्रयत्न म्हणजे आमचा मंच — लोकायत. लोकायत ही, वैदिक काळापासूनची एक प्राचीन भारतीय विचारसरणी. जीवन सम्यक रीतीने जगण्याचा हा विचार आहे. समस्या मानवनिर्मित आहेत, त्यांना सामोरे गेले पाहिजे, ही प्रेरणा लोकायती विचार देतात. आम्ही ही परंपरा स्वीकारतो म्हणूनच या विचारपीठाचे नाव लोकायत.

खरंतर आपल्या देशातील सामान्य जनता अतिशय गंभीर संकटांच्या जाळ्यात अडकलेली आहे. भारतीय समाजात जातीवाद, धर्मांधता, महिलांवरील अत्याचार, गरिबी अशा विविध सामाजिक समस्या पूर्वीपासून आहेतच. भारतीय राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांना धाब्यावर बसवून आजचे सर्व राज्यकर्ते कारभार करत आहेत. त्यातच आता देशात राबवल्या जाणाऱ्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या आर्थिक धोरणांमुळे नवीन समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. आपले शासनकर्ते स्वतःच्या स्वार्थासाठी देश बहुराष्ट्रीय कंपन्यांना विकत आहेत. या कंपन्यांना स्वस्त वीज, स्वस्त पाणी, स्वस्त कर्ज, कर्जमाफी, करमाफी अशी खैरात जनतेच्या पैशांमधून वाटली जात आहे. आणि दुसरीकडे सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडले आहे. शेती उजाड होत चालली आहे. शेतकरी देशोधडीला लागून शहरांकडे धाव घेत आहेत किंवा आत्महत्या करीत आहेत. धान्य, तेल, डाळी, पेट्रोल, गॅस, वीज, पाणी, टेलीफोन अशा सगळ्याच जीवनावश्यक वस्तूंची महागाई आभाळाला भिडली आहे. तुमचं आमचं जिणं दिवसेंदिवस जिकिरीचं होत चाललं आहे.

हे थांबवणं शक्य आहे. देशातील लोकांनी ठरवलं तर नक्कीच शक्य आहे. गरज आहे ती आपणा सर्वांच्या एकजुटीची. आपण सर्व जण — विद्यार्थी, युवक, कष्टकरी, बुध्दिजीवी — एकत्र आलो तर देशातील सर्वसामान्य जनतेच्या हिताचा चांगला पर्याय देऊ शकतो. नफेखोरी, स्वार्थी वृत्ती गाडून सर्वांचा सामूहिक विकास साधणारी आणि सर्वांचं जीवनमान उंचावणारी विकासनीती राबवू शकतो. आपल्याकडे प्रचंड निसर्गसंपदा आहे. साधनसंपत्तीचा पुरेपूर वापर करण्यासाठी



लागणारं मनुष्यबळ आपल्या देशात मुबलक आहे. असं असूनही आपण जगातल्या गरिब देशांपैकी एक आहोत.

पण मोठं परिवर्तन घडवून आणायचं असेल तर प्रथम प्रचलित समजुतींवर जोरदार हल्ले चढवावे लागतील. वादविवाद, चर्चा घडवून आणाव्या लागतील. ही पुस्तिका आम्ही याचसाठी प्रकाशित करीत आहोत.

आपणही या विचारांशी सहमत व्हाल. आज आपलंच सरकार देश गहाण टाकून गरिबांच्या जिवावर उठलं असताना आपण असहाय्य होऊन गुपचुप बसणार का? निराशा आणि अंधःकारातून मार्ग तर काढायलाच हवा. आपल्याला एक पाऊल पुढं टाकायलाच हवं.

ह्या सर्व प्रश्नांवर जनजागृती करणे, ठिकठिकाणी लोकांना संघटित करणे व नवीन लोककेंद्री पर्याय देण्याच्या उद्दिष्टाने आम्ही खालील उपक्रम राबवतो:

- शिक्षण-वीज-आरोग्यसेवा ह्यांचे बाजारीकरण, शहरातील सार्वजनिक वाहतूक समस्या, अणुऊर्जेसारखे घातक प्रकल्प, जनुकीय बदल केलेल्या अन्नांचे दुष्परिणाम, वाढती महागाई, अशा प्रश्नांवर व्यापक जनजागृती करून लोकांना संघटित करण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी या प्रश्नांवर आधारित पथनाट्य, पोस्टर प्रदर्शन, गाणी अशा कला प्रकारांचा उपयोग करतो; तसेच सेमिनार, व्याख्याने, धरणे, मोर्चे, जाहीर सभाही आयोजित करतो.
- विकासाच्या नावाखाली उद्ध्वस्त होत असलेले जगजीवन, जात जमातवाद, चंगळवाद, अमेरिकेचा साम्राज्यवाद, जागतिक तापमान वाढ, इ. अनेक विषयांवर माहितीपट-चित्रपट दाखवतो, त्यांवर चर्चा घडवतो.
- अभिव्यक्ती या महिलांच्या गटाद्वारे महिलांचे हक्क प्रस्थापित होण्यासाठी आणि महिलांच्या प्रश्नावर सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी कॉलेजेसमध्ये व वस्तीपातळीवर काम करतो.
- या सर्व प्रश्नांवर आम्ही पत्रके व पुस्तकेही प्रकाशित करतो.

बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या विरुद्ध संघर्षाचे प्रतिक म्हणून 'कोक-पेप्सी भारत छोडो' अशी मोहीम आम्ही हाती घेतली आहे. या आणि इतर सर्व मोहिमांमध्ये सामील होण्यासाठी तुम्ही आम्हाला पुढे दिलेल्या संपर्कावर नक्की संपर्क करु शकता.

**संपर्क पत्ता**

लोकायत, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, पुणे–4
(दर रविवारी सायं. 5 ते 7 या वेळेत मीटिंग होते.)

**संपर्क फोन**

अजित पेंटर 94235 86330 अलका जोशी 94233 19129

**Website**: www.lokayat.org.in **Email:** lokayat.india@gmail.com
**Mailing List:** lokayat.pune@lists.riseup.net